# महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग,
गोरुग्णालय संकुल .ते ., १० वा मजला, मंत्रालय, मुंबई- ०१
दुरध्वनी क्र.०२२-२२६१७५१०  ई-मेल ID-nilesh.falke@nic.in

COLLEGE OF PHYSICIANS & SURGEONS OF MUMBAI No. 494 Date: 23/5/22

**तात्काळ**

क्रमांक-: बैठक-२०२२/प्र.क्र ३४९/कु.क  **दिनांक :- /१८/०५/२०२२**

प्रति,

१) आयुक्त .मुंबई ,राष्ट्रीय आरोग्य अभियान ,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक ,
२) आयुक्त ,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय ,मुंबई.
३) संचालक (२), आरोग्य सेवा, पुणे
४) अध्यक्ष, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल,१८९-अे, आनंद कॉम्प्लेक्स, पहिला मजला, साने गुरुजी मार्ग, ऑर्थर रोड नाका, चिंचपोकळी (प), मुंबई-११
५) सचिव, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, १८९-अे, आनंद कॉम्प्लेक्स, पहिला मजला, साने गुरुजी मार्ग, ऑर्थर रोड नाका, चिंचपोकळी (प), मुंबई-११
६) अध्यक्ष (CPS), कॉलेज ऑफ फिजीशियन अॅन्ड सर्जन, सी.पी.एस. हाऊस, ई बोर्जेस रोड, आयटीसी ग्रॅंड सेंट्रल जवळ, ग्लोबल हॉस्पीटल समोर, परेल, मुंबई-१२.
७) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट ब्रांच ऑफ इंडियन रेडिओलॉजी इमॅजीनिंग असोसिएशन, ५/३०८, आवाडे थिएटरसमोर, इचलकरंजी, जि. कोल्हापूर.
८) श्री. सुरेंद्र प्र. चानकर, उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) श्री. अजित सासुलकर, अवर सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विषय -: PCPNDT कायद्यांतर्गत वैद्यकीय व्यवसायिकांना (CPS) डी. एम. आर. ई. पदवी धारकांना नोंदणीबाबत दि .२८/०४/ २०२२ रोजी दुपारी १.३० वाजता आयोजित बैठकीचे इतिवृत्त .**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने **मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली** दि. २८/०४/२०२२ रोजी मा. मंत्री महोदयांच्या दालनात बैठक घेण्यात आली.

२. सदर बैठकीचे इतिवृत्तास मा. मंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. सबब, सदर बैठकीचे इतिवृत्त पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे.

१८/५/२२

( निलेश फाळके)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव

प्रत :- १) मा. मंत्री, सा.आ. व कु.क. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अ.मु.स.(सा.आ.वि.) यांचे स्वीय्य सहायक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सहसचिव (कु.क.) यांचे स्वीय्य सहायक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) निवडनस्ती

T.T.
23/5/22

**PCPNDT कायद्यांतर्गत वैद्यकीय व्यवसायिकांना (CPS) डी.एम.आर.ई. पदवी धारकांना नोंदणी संदर्भात बैठक**

गुरुवार दि. २८.०४.२०२२ रोजी चे इतिवृत्त

PCPNDT कायद्यांतर्गत वैद्यकीय व्यवसायिकांना (CPS) डी.एम.आर.ई. पदवी धारकांना नोंदणी संदर्भात बैठक गुरुवार दि. २८.०४.२०२२ रोजी दु. १.३० वा मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) डॉ. रामास्वामी एन, आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) विरेंद्र सिंग, आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
३) डॉ. अर्चना पाटील, संचालक (२), आरोग्य सेवा, पुणे
४) डॉ. एस.एस. उत्तूरे, अध्यक्ष, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल
५) डॉ. संदीप पानसरे, सचिव, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल
६) डॉ. गिरीश महिंद्रकर, अध्यक्ष (CPS), कॉलेज ऑफ फिजीशियन ॲन्ड सर्जन, मुंबई.
७) डॉ. बाळकृष्णा कित्तूरे, अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट ब्रांच ऑफ इंडियन रेडिओलॉजी इमॅजीनिंग असोसिएशन.
८) श्री.वि.ल.लहाने, सह सचिव, सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई
९) श्री. सुरेन्द्र प्र. चानकर, उपसचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) श्री. अजित सासुलकर, अवर सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) श्री.निलेश फाळके, अवर सचिव, सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई

बैठकीच्या सुरुवातीला केंद्र शासनाच्या दि. १३.०४.२०२२ च्या पत्राच्या अनुषंगाने २०१७ नंतर कॉलेज ऑफ फिजिशियन व सर्जन (CPS) मधून DMRE ही पदविका घेतलेल्या वैद्यकीय व्यासवायिकांना PCPNDT अंतर्गत नोंदणी करणे योग्य ठरणार नाही असे कळविले असल्याने राज्यातील ६०३ विद्यार्थ्यांचे भवितव्याच्या अनुषंगाने मार्ग काढण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यानुसार मा. मंत्री (आरोग्य) यांनी बैठकीवेळी केंद्र शासनाचे अवर सचिव श्री. पी.व्ही. मोहनदास यांचेशी याबाबत दूरध्वनीद्वारे चर्चा केली. त्यावेळी केंद्र शासनाचे अवर सचिव, श्री. मोहनदास यांनी केंद्र शासनाचे दि. १३.०४.२०२२ चे पत्र मागे घेण्याबाबत कार्यवाही सुरु असून लवकरच त्याबाबत आपणास कळविले जाईल असे नमूद केले. त्याअनुषंगाने मा. मंत्री महोदयांनी सदर बाब अतिरिक्त संचालक, यांनी सर्व अंमलबजावणी यंत्रणांना ( सर्व जिल्हा शल्य चिकित्सक/ सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी/ आरोग्य अधिकारी महानगरपालिका/ उपसंचालक आरोग्य सेवा मंडळे) यांना तात्काळ कळविणेबाबात निर्देश दिले.

बैठकीच्या शेवटी आभार व्यक्त करून बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

--------

C:\Users\jayashri.pawnikar\Desktop\449-2022.docx